**<u>मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची मंगळवार दिनांक २२.२.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या १३६ व्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकीय बैठकीचा व सदर तहकुब झालेल्या व दि.२८.०२.२०११ रोजी संपन्न झालेल्या १३६व्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकीय बैठकीचा कार्यवृत्तांत.</u>**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३६ वी अंदाजपत्रकीय बैठक मंगळवार दिनांक २२ फेब्रुवारी २०११ रोजी दुपारी ३.००वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्या वरील गुलझारी लाल नंदा सभागृहात झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.सुभाष हजारे, भा.प्र.से. | उपसभापती तथा मुख्य अधिकारी |
| २. | मा.श्री.नंदकुमार काळे, | सदस्य |
| ३. | मा.व्ही.जी.नायर | सदस्य |
| ४. | मा.श्री.किसन बा.जाधव | सदस्य |
| ५. | मा.श्रीमती.सुरेखा पाटील | सदस्या |
| ६. | मा.श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ७. | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| ८. | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ९. | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १०. | मा.श्रीमती.उल्का पाटकर | सदस्या |
| ११. | मा श्री.शरद शिरिषकर | सदस्य |
| १२. | श्री.र.वा.दळवी,<br>उपकर निर्धारक व संकलक<br>(रिपेअर सेस महापालिका) | नियंत्रक |
| १३. | श्री.पी.पी.महिषी,<br>निवासी कार्यकारी अभियंता, | सचिव |
| १४. | श्री.ओ.बी.साहू | सहमुख्य अधिकारी |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव श्री.महिषी यांनी सन्मा.सदस्य श्री.कमरुद्दिन मर्चंट हे बैठकीस कांही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकणार नाहीत, असा त्यांचा दूरध्वनी आल्याचे सांगितले.

सचिव,श्री.महिषी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १३६ व्या अंदाजपत्रकीय बैठकीत सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत करुन सर्व सन्माननीय सदस्यांना विषयसूची पाठविली असल्याचे सांगितले व मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

श्री.महिषी, सचिव, यांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने मूळ विषयसूचीतील विषय चर्चेस घेण्यांत आले.

श्री.महिषी,सचिव यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.२८.१.२०११ रोजी झालेल्या १३५ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत. पृष्ठ क्र. १ ते ११ वर सादर करण्यांत आले आहे, असे सांगितले.

यावेळेस मा.अध्यक्ष यांनी अशा सूचना केल्या की, बाब क्रमांक १३६.२ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-१२ चे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्रथम घेण्यात यावा, कारण सदर अर्थसंकल्प हा प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करावयाचा असल्याने, यावर प्रथम चर्चा करण्यांत यावी व नंतर बाब क्रमांक १३६.१ मागील बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याचा विषय घेण्यांत यावा. असे प्रस्तावित केल्याने बाब क्रमांक १३६.२ चा विषय प्रथम घेण्यात आला.

<u>बाब क्रमांक : १३६.२:-</u>

**विषयः-**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सन २०१०-११ चा अहवाल व सन २०११-१२ चा अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्याबाबत.

उपरोक्त बैठकीचे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक पुस्तिका बैठकीत सादर करण्यांत आल्या.

मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी अंदाजपत्रक मूळ विषयसूची सोबत न पाठविता थेट बैठकीत सादर केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. रु.१०० कोटींपेक्षा अधिक तरतूद असलेल्या अंदाजपत्रकामध्ये कोणत्या गोष्टी अंतर्भूत केल्या आहेत, याचा अभ्यास करायला वेळ लागतो, जेणेकरुन सन्मा.सदस्यांना त्यावर योग्य निर्णय घेणे उचित होईल.

अर्थसंकल्पाचे ठळक वैशिष्टय थोडक्यात सांगावे असे मा.सदस्य श्री.किसन जाधव यांना विनंती केली. त्यावर मुख्य लेखाधिकारी श्री.तपासे यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली. १९वा वार्षिक अर्थ संकल्प आहे. त्याचा गोषवारा मा.सदस्यांना दिलेला आहे, व सदर गोषवाऱ्यामध्ये या वर्षाच्या सुधारित अर्थसंकल्पामध्ये ६४ कोटींची तूट आहे आणि पुढच्या वर्षाच्या २०११-१२ मध्ये ७० कोटींचा अपेक्षित आधिक्य दाखविलेले आहे. मंडळास मूलत: जो खर्च अपेक्षित आहे, तो शेवटच्या पानावर दाखविलेला आहे. या वर्षी आपण १०० कोटींची कामे घेतली होती. त्याच्या ऐवजी सुधारणा होऊन १३० कोटींची कामे घेण्यांत आली आहेत व पुढच्या वर्षी १२५ कोटींची कामे प्रस्तावित आहेत. यासाठी आवश्यक निधी प्रतिपूर्ती शासनाकडून वेळेवर होत नसल्याने, त्यापोटी लागणारा निधी आपण प्राधिकरणाकडून तात्पुरता घेऊन आपली कामे करतो.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती केली की, अर्थसंकल्पात मंजूरी द्यावी. यावर सचिव यांनी असे सांगितले की, सदर दुवपु मंडळाचा अर्थसंकल्प प्राधिकरणाच्या बैठकीसमोर सादर करावयाचे असल्याने, त्यास मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

त्यावर प्राधिकरणाची अर्थसंकल्पीय बैठक कधी असलयाचे मा.सदस्य श्री.बशीर पटेल व श्री.हेमराज शहा यांनी विचारले, त्यावर मुख्य लेखाधिकारी श्री.तपासे यांनी सदर प्राधिकरणाच्या बैठकीची तारीख अद्यापि ठरली नसल्याचे सांगितले.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी मुलेअ/दुवपु यांना सांगितले की, मुंबई मंडळाने अर्थसंकल्पाची विषयसूची आगाऊ पाठविली असल्याचे कळते, त्यामुळे आपण देखील पुढच्या वर्षापासून अशी प्रथा चालू करु व सदस्यांना अंदाजपत्रकीय पुस्तिका आगाऊ पाठविण्याची व्यवस्था करावी.

यावर सदस्य श्री.किसन जाधव यांनी विचारले की, सर्व सन्मा.सदस्य जर अभ्यास करुन येणार असतील तर बैठक तहकूब करुन २-३ दिवसांनी घेता येईल, त्यावर श्री.बशीर पटेल यांनी सांगितले की, सदर अंदाजपत्रकाबाबत आमचेही कांही अभिप्राय/मते आहेत, त्यासाठी आम्हाला अभ्यास करावयास वेळ मिळणे जरुरी आहे व त्यामुळे सदर अंदाजपत्रक या बैठकीत मंजुरीसाठी ठेवू नये, असे सांगितले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी जुन्या इमारतीच्या दुरुस्ती/पुनर्बांधणीबाबत अंतर्भूत केलेल्या कार्यक्रमावर चर्चा करताना असे प्रतिपादन केले की, सेस निधीपोटी म.न.पा.कडून हया वर्षी ७५ कोटी जमवलेले आहेत, तेवढी मॅचिंग ग्रॅन्ट शासनाने आम्हाला द्यावी, असे आपण शासनाला लिहिलेले आहे, त्याचा आपण पाठपुरावा करीत आहोत. जेवढी वसुली होते, त्याच्या समतुल्य फंड शासनाने मंडळास द्यावे, कारण शासन आपण वसूल केलेलेही पैसे देत नाही. १० कोटी म्हाडा व म.न.पा.चे अनुदान आहे तिथेही २५ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे. बजेटमध्ये सुधारणा होऊन अधिक निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यावर मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी सांगितले की, दुरुस्ती मंडळास जास्तीत जास्त अनुदान शासनाकडून मिळण्याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करण्यांत येईल.

चर्चेअंती सर्व सन्मा.सदस्यांच्या विनंतीला मान देऊन अर्थसंकल्प अंदाजपत्रिकेचा अभ्यास करण्याचे दृष्टीने सदर बैठक तहकूब करुन ती दि.२८.२.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता पुन्हा घेण्याचे सर्वानुमते ठरले.

**<u>बाब क्रमांक १३६.१</u>**

विषय:-दिनांक २८.१.२०११ रोजी झालेल्या १३५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १ ते ११ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पृष्ठ क्र. ३ वर "इमारतीवर भाडेकरुंप्रमाणे माणशी हिशेबाने खर्च न करता " या शब्दांवर हरकत घेतली व येथे स्क्वे.मी.ने खर्च न करता अशी सुधारणा सुचविली.

तद्नुसार सदर सुधारणेस सचिव यांनी मान्यता देऊन त्याची नोंद कार्यवृत्तांतात घेण्यात येईल, असे सांगितले.

मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी पृष्ठ क्र.६ वरील ठराव क्रमांक १३५/११६४ मधील मुद्दा क्रमांक १ व २ मध्ये अंतिम निर्णय काय झाला ?

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी असे सांगितले की, बृहत्सूचीसाठी अतिरिक्त क्षेत्रफळामध्ये वाटपासंदर्भात धोरणात्मक निर्णय प्राधिकरणाच्या मंजुरीस्तव सादर करुन, मान्यता घेण्यांत येईल. मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.श्री.सचिनभाऊ अहिर, हे सभापती असतांना सभापतींच्या अध्यक्षते खाली सहमुख्य अधिकारी, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) आणि मंडळाचे दोन सदस्य अशी समिती होती. तद्नुसार अशी समिती गठित करण्यांत यावी, असे सांगितले,मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी या प्रस्तावास सहमती दर्शविली.मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे मत व्यक्त केले की, सभापती जर उपस्थित नसतील तर त्यावेळेस मंडळाच्या सदस्यांना निर्णय घ्यावयाचे अधिकार द्या. मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी त्यास पाठींबा दर्शविला.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सांगितले की, धोरणामध्ये एखाद्या अर्जदाराने मागणी केलेली सदनिका त्याच्या मूळ उपकरप्राप्त इमारतीमधील सदनिकेच्या क्षेत्रापेक्षा ५ टक्के क्षेत्रफळ जास्त परंतु जास्तीत जास्त ५० चौ.फूट अधिक क्षेत्रफळाची सदनिका उपलब्धेनुसार देण्याच्या सुधारणेसह धोरणास मान्यता देण्याचे ठरले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी बाब क्र.१३५.१मधील पृष्ठ क्र. २ मधील परिच्छेद ३ मधील मंगलवाडीच्या प्रस्तावाबद्दल विचारणा केली, यावर सचिव यांनी असे सांगितले की, उपमुख्य अभियंता,परिमंडळ-२ यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. त्याची तपासणी करुन, पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करण्यांत येईल.

म्हाड अधिनियम कलम ७७ बी अंतर्गत व्हेकेशन नोटीसचा नमुना नुकताच प्राप्त झाला असून, व्हेकेशन नोटीसच्या संदर्भात कलम ९० (१) आणि ७७ बी चा एकत्रित प्रस्ताव आगामी बैठकीत सादर करण्यांत येईल.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी विचारले की, आपण एक गट नेमला होता त्याचे काय झाले, यावर मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सांगितले की, या संदर्भात अहवाल पाठविलेला आहे, यावर मुख्य अधिकारी म्हणाले की, तो अंतिम अहवाल आहे का ?

श्री.किसन जाधव,सदस्य यांनी सांगितले की, तो अंतिम अहवाल आहे. आम्ही बैठक घेऊन चर्चा केली, व अहवाल पाठविण्यिांत आला असून, त्यावर बैठकीत चर्चा व्हावी, असे सूचित केले.

त्यावर मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी हा विषय एवढा क्लिष्ट असुनही यावर योग्य वेळेत कार्यवाही करुन अहवाल सादर केल्याबद्दल मंडळाचे सदस्य व संबंधित अधिकारी यांचे अभिनंदन केले.

मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी असे सांगितले की, मा.मुख्यमंत्री यांना देखील अहवालाची प्रत पाठविण्यांत आली. मुंबईतील १६००० दुरुस्त करावयाच्या इमारतीतील लोकांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. आपण यावर ठोस निर्णय घ्यावा, आपल्याकडे चांगले अधिकारी आहेत, उपमुख्य अधिकारी आहेत, लवकरच विशेष बैठक घेऊन, सचिवांकडे मिटींग लावून गरीबाला न्याय मिळवून द्यावा, अशी आमची अपेक्षा आहे.

* मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे सांगितले की, आपण जो अभ्यास गट नेमला आहे, त्यावर आपण सखोल चर्चा केली, आम्ही यामध्ये कांही सुधारणा आणण्याचा प्रयत्न करणार आहोत, आज जो दर रु. २००० आहे तो रु. २५०० होईल पण आपण यावर जो कांही धोरणात्मक निर्णय घेऊ इच्छितो त्या संदर्भात मी आपल्या मंडळाचे अधिकारी तसेच म.न.पा.चे अधिका-यासोबत चर्चा केली. त्यामध्ये कांही मुद्दे आलेले आहेत, फार घाईने आम्ही अहवाल तयार केला आहे. ते लवकर करण्यामागे असा हेतू होता की, पाऊस लवकरच जवळ आलेला आहे. आता शासनाचे बजेट देखील जवळ येत आहे. त्यामध्ये कांही तरतूद करता येईल का ? त्यामध्ये हयाबाबत कांही निर्णय होण्याकरिता देखील आम्ही घाई केली. म्हणून आम्ही सर्व मिळून चर्चा केली.

अभ्यास गटाने वर दिलेल्या अहवालाला धरुन बजेटमध्ये समावेश करण्यांत यावा. अशा प्रकारचा प्रस्ताव मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभेपुढे मांडला.

मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी पृ.क्र.१२ मधील परिच्छेद क्र.३ वर इमारत दुरुस्ती कामाचा माहिती फलक लावण्याबाबत झालेल्या चर्चेबाबत विचारणा केली. इमारतीला दुरुस्ती फ्लेक्स फलक लावण्याची सूचना मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी दिलेल्या असूनही, संबंधित अधिकारी सुचनांचे पालन करीत नाही, याबाबत नाराजी व्यक्त केली व अभियंत्यांकडून मंडळाच्या सदस्यांच्या सुचनांचा आदर होत नाही, याबद्दल खेद व्यक्त केला.

सर्व उपमुख्य अभियंता,यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या अभियंत्यांकडून वरील सुचनांचे पालन होत असल्याबद्दल खातरजमा करावी, अशा सूचना मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी दिल्या.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी सांगितले की, फलक सर्व ठिकाणी लागले पाहिजेत, याकडे लक्ष द्यावे व फलकावर लिहावयाचे ठळक मुद्दे/ प्रारुप उपमुख्य अभियंता,परिमंडळ-१ यांनी अंतिम करुन मंडळासमोर अवलोकनार्थ सादर करावे व सर्व कार्यकारी अभियंता यांना कळवावे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सांगितले की, मागच्या बैठकीत श्री.आर्गेकर,उपमख्य अभियंता,परि-१ यांनी दुरुस्ती कामाची पध्दत विशद केली परंतु त्यांनी सांगितल्याप्रमाणे काम होत नाही. पॅनेलवर असलेले आर्किटेक्ट आपल्या सहाय्यकाला पाठवितो, भाडेकरुंना आपला वास्तुशास्त्रज्ञ कोण आहे हे देखील माहिती नसते. तरी नियमाप्रमाणे ज्या ज्या गोष्टी व्हायला पाहिजेत, त्या त्या झाल्याच पाहिजेत, आपण आर्किटेक्टला फी देतो, तर त्याचे काम आहे की, दुरुस्ती काम बरोबर होत आहे की नाही, हे पहाणे.

मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी परिसर परिचय हे त्रैमासिक सर्व सदस्यांना मिळत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. यावर मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी श्रीमती.सद्दानसिंग, जनसंपर्क अधिकारी यांना अशा सूचना केल्या की, सर्व सदस्यांना त्रैमासिक पोस्टाने पाठविण्यांत यावे. तसेच बैठकीत सर्व सदस्यांना मागील अंक वितरीत करण्यांत आले.

श्री.शिरिषकर यांनी पृष्ठ क्र. १२ परिच्छेद क्र.२ मध्ये मागणी केल्यानुसार त्यांना ११७ सदनिकांची माहितीची यादी हवी होती, ती त्यांना देण्यांत आलेली आहे.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी सांगितले की, सर्व कार्यकारी अभियंत्यांनी पुनर्रचित इमारतीमध्ये रिक्त सदनिकांची यादी दिलेली आहे, रिक्त गाळे कार्यकारी अभियंता यांच्या ताब्यांत आहेत, त्यांची अहवालानुसार कांही ठिकाणी न्यायालयीन प्रकरण आहे कांही ठिकाणी अनधिकृत व्यक्ती आहेत. यामध्ये कलम ९५-अ अन्वये कार्यवाही करावी. १८० व २२५ चौ.फुटापर्यंतचे जेवढे गाळे कार्यकारी अभियंता यांच्या ताब्यांत आहेत, त्यांची यादी पुढचा बैठकीत सादर करण्याचे आदेश देण्यांत आले.

मुंबई मंडळाला जे गाळे वर्ग करावयाचे आहेत १८० व २२५ चौ.फुटाचे गाळे आहेत. ते पुनर्रचित इमारतीतील असतील अथवा एन.ओ.सी.चे असतील या सर्वांचाही अद्ययावत अहवाल या पध्दतीने पुढच्या बैठकीत ठेवण्याचे आदेश मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी दिले.

मा.सदस्य श्री.शरद शिरीषकर यांनी माहिती विचारली की, आपण मुंबई मंडळाला जे गाळे वर्ग केले होते ते किती होते ?

त्यावर आज उपमुख्य अधिकारी/पुगा. श्री.मठपती कोर्टात गेलेले आहेत. बैठकीला उपस्थित नाही आहेत, ते पुढच्या बैठकीत याचा अहवाल देऊ शकतील. असे मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ म्हणाले. त्यावर मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी उपमुख्य अधिकारी/पुगा यांनी फक्त १७ गाळे उपलब्ध असल्याची चुकीची माहिती दिल्याचे सांगितले.

मा.सदस्य शिरीषकर यांनी मागील बैठकीत चर्चा केल्यानुसार भैरवनाथ, रामदूत सदन व आंबेडकर सदन या पुनर्रचित इमारतीविषयी माहिती विचारली.

कार्य.अभि.ग/द विभाग श्री.शेठ यांनी सांगितले की, आंबेडकर सदन मध्ये रु.नं.८२च्या संदर्भात न्यायालयीन प्रकरण प्रलंबित होते व त्याचा आता निकाल लागला आहे.

रामदूत सदन येथील गाळा वितरीत केलेला आहे. मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी सदर गाळयाचे वितरण कोणाला झालेले आहे. याबद्दल विचारणा केली, त्यावर श्री.हावळ, कार्य.अभियंता,फ/द विभाग, यांनी गाळा क्र.१३५ हा श्रीमती.करपे यांना दि.२१.८.२००९ रोजी वितरीत केलेला आहे, असे सांगितले.

तसेच भैरवनाथ सदन या इमारतीतील गाळा कोणाला व कसा वितरीत केला आहे, याबबात मा.सदस्य श्री.शिरीषकर यांनी विचारणा केली. यावर मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी सांगितले की, या संदर्भात सर्व माहिती श्री.मठपती,उमुअ/पुगा हे सांगू शकतील.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी स्ट्रक्चरल ऑडिटचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर चर्चा करतांना मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी असे प्रतिपादन केले की, आता 'अ','ब' व 'क' वर्गवारीमध्ये सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधिन असून, सन १९६९ अगोदरच्या सर्वच इमारती अ-वर्गात मोडतील. आगामी अधिवेशनात यामध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे. म.न.पा.ने सर्व इमारतींना स्ट्रक्चरल ऑडिट अनिवार्य केलेले आहे, अशी माहिती सभागृहाला दिली.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांचे पॅनेलवरील तज्ञमंडळींना आपल्या इमारतींचे काम द्यावे व त्यांना लागणाऱ्या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात करुन त्यांना मोबदला देण्यांत यावा.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी जेएन,एनयुआरएम अंतर्गत म.न.पा. व इतर शासकीय संस्थांना अनुदान मिळते त्याच धर्तीवर मंडळास अतिरिक्त अनुदान मिळविणे शक्यतेबाबत पडताळणी करण्याबाबत सूचना केली.

मा.विधानसभा, विधानपरिषद सदस्य, तसेच मा.खासदार यांची दुरुस्ती कामावर फंड द्यावयाची मर्यादा रु.१५ लक्ष आहे, ती वाढवून देण्याकरिता शासनास विनंती करण्याचे ठरले. जर मालक पुनर्बांधणी करण्यास तयार नसेल, तर मालकासोबत जॉईंट वेंचर करावयाचे किंवा मंडळाने भूसंपादनाची प्रक्रिया सुरु करुन पुनर्बांधणी योजना राबवावयाची, तथापि यास भाडेकरु तयार नसल्यास, मंडळाकडून योजना राबविण्यास अडचण निर्माण होते, अनावश्यक वेळ खर्ची जातो. त्यामुळे म्हाड अधिनियमात मंडळामार्फत योजना राबविणेसाठी आवश्यक बदल/सुधारणा करणेकरिता प्रस्तावाचा विचार होणे जरुरी असल्याचे मा.सदस्यांनी सांगितले.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी यावर सांगितले की, जमीन मालकाचा प्रॉपर्टीवरील हक्क डावलता येणे शक्य होणार नाही, एखाद्या मालकाची जमीन आपल्याला भूसंपादनाशिवाय घेता येत नाही. आपल्या संपादित मालमत्तेचा जाईंट व्हेंचर खाली करण्याची तरतूद कायद्यात करण्याचे शासन स्तरावर विचाराधिन आहे. परंतु उपकरप्राप्त इमारतीबाबत असे करता येत नाही. मा.सदस्य श्री.किसन जाधव म्हणाले की,ही भूसंपादनाची प्रक्रिया फार वेळकाढूपणाची आहे.

सदर विषयावर बोलतांना मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, जॉईंट वेंचरच्या नियमावली शासन स्तरावर अंतिम झाल्यास मालकाकडून म्हाडास मिळणारे २० टक्के गाळे मास्टरलिस्टमधील भाडेकरुंना वितरीत करणे शक्य होईल. ज्याप्रमाणे एमएमआरडीएमध्ये भूसंपादन केवळ ३ महिन्यात पूर्ण होते, त्या धर्तीवर जर आपण संपादनाची प्रक्रिया सुरु केली तर कायदयाच्या चौकटीत राहून आपण भूसंपादनाची प्रक्रिया कमीतकमी वेळात पूर्ण करणे शक्य होईल.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सांगितले की, भूसंपादनाची पध्दत कशी सोयीची करता येईल, जसे की, एमएमआरडीएमार्फत ३ महिन्यांत भूसंपादन होते, त्यानुसार शीघ्रगणकानुसार किंवा टी.डी.आर.स्वरुपात मोबदला देऊन, भूसंपादन करता येईल का ? यावर विचार व्हावा.

मुख्य अधिकारी यांनी यावर एमएमआरडीए मध्ये ३ महिन्यांत जी भूसंपादन करण्याची पध्दत आह, त्यावर अभ्यास करुन त्याबद्दल सविस्तर माहिती उपमुख्य अभियंता, परिमंडळ-१ यांना सादर करण्यास सूचना दिल्या.

तद्नंतर मा.सदस्यांनी असे निदर्शनास आणले की, कांही जमिनी १०० महिन्यांचे भाडे मालकाला देऊन म्हाड अधिनियम प्रकरण ८ (अ) खाली संपादित केलेल्या आहेत. तथापि मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित न्याय प्रविष्ट प्रकरणांमुळे अशा जमिनीचा ताबा मंडळाकडे आलेला नाही, प्रकरण आजही सुप्रिम कोर्टात प्रलंबित आहे. इमारतीखालील जमिनी आपल्या ताब्यांत आहेत तथापि त्यांची दुरुस्ती कोणी करावयाची हा प्रश्न निर्माण झाला आहे.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी असे सांगितले की, प्रकरण ८ अ अंतर्गत संपादन पूर्ण होऊन, व सहसंस्थेस ताबा देण्यांत आलेल्या १४ प्रकरणांमध्ये इमारतींची दुरुस्ती मंडहाकडून करता येणार नाही, मात्र भूसंपादन प्रक्रिया पूर्ण न झालेल्या सर्व इमारतींच्या दुरुस्तीची जबाबदारी आपल्यावर आहे.

मा.सदस्य श्री.शरद शिरीषकर यांनी प्रभादेवी येथील बोटावाला चाळीमध्ये नागोसयाजीच्या वाडीमध्ये ३० टक्के लोकांनी जागा खाली केली परंतु ७० टक्के लोक तिथेच आहेत, असे सांगितले व सदर ७० टक्के लोक रहात असलेल्या इमारतींची दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी त्यावर सांगितले की, जर नवीन इमारत तयार असेल तर जुन्या लोकांनी नवीन इमारतीत स्थलांतरित होणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांना कलम ९५ (अ) अंतर्गत नवीन इमारतीत स्थलांतरित करणे क्रमप्राप्त होईल.

मा.सदस्य श्री.शिरीषकर तिथल्या रहिवाश्यांचे म्हणणे आपण ऐकून घेतले पाहिजे, त्यासाठी सुनावणी लावावयास पाहिजे, असे सांगितले.

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक तहकूब करण्यांत आली व तहकूब केलेली बैठक दि.२८.२.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता पुन्हा आयोजित करण्यांत येत असल्याचे सर्व सन्मा.सदस्य, तथा उपस्थित सर्व अधिका-यांना सांगण्यांत आले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

मा.उप सभापती तथा मुख्य अधिकारी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

\\G४३\d\My Documents\REE\Meeting\१३६ Budget Meeting's Minutes Correction by Gharat S.E..doc